EDUCATION OF HUMAN POWER FOR TECHNOLOGICAL EXCELLENCE
SHRI GURU GOBIND SINGHJI
INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY,
VISHNUPURI, NANDED - 431 606 (M.S.)
(Government Aided Autonomous Institute)
Website: www.sggs.ac.in Tel : ( D )02462-229234 Fax No. 229236

क.एसजीजीएसआईॲन्डटी / आस्था / 2020 / 157
दिनांक: 23 जानेवारी 2020.

## !! सुचना !!

संदर्भ: महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क.संकिर्ण 2020 / प्र.क.25 / आस्था –5 बांधकाम भवन, फोर्ट मुंबई दिनांक 22 जानेवारी 2020.

संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना सूचित करण्यात येते की, दिनांक 26 जानेवारी 2020 रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ संस्थेच्या प्रांगणात सकाळी 08.00 वाजता आयोजित करण्यात येत आहे.

तत्पुर्वी महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क.संकिर्ण 2020 / प्र.क.25 / आस्था –5 बांधकाम भवन, फोर्ट मुंबई दिनांक 22 जानेवारी 2020 अन्वये सुचीत केल्यानुसार ध्वजारोहन कार्यक्रमापुर्वी भारताच्या संविधानामधील उद्देशिका (सरनामा) /Preamble याचे सामुहिक वाचन करण्यात येणार आहे.

### भारताचे संविधान

### उद्देशिका

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी
धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व
*नागरिकास ;*
*सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;*
*विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य ;*
*दर्जाची व संधीची समानता ;*
*निष्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तींची*
*प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी*
*बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करुन ;*
*आमच्या संविधानसभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर, 1949 रोजी*
*याव्दारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत*
*अर्पण करीत आहोत.*

ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सकाळी 7.15 वाजता आनंदनगर, रामानंदनगर व सिडको येथुन बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तरी संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी ध्वजारोहण समारंभास वेळेवर उपस्थित रहावे.

संचालक

प्रतिलिपी:
1. श्री आर.बी. गोदलवार, वरिष्ठ लिपीक यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
2. प्र.निर्माण स्थळ अभियंता, यांना कळविण्यात येते की, ध्वजारोहण कार्यक्रमाची संपुर्ण तयारी करण्यात यावी तसेच श्री जि. बी. धनमने, माळी यांना ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी श्री आर. बी गोदलवार यांचेकडे पाठविण्यात यावे.
3. वाहन विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, वरील वेळेप्रमाणे बसेसची व्यवस्था करावी.
4. डॉ.सौ. आर.व्हि. सर्वज्ञ, सहयोगी प्राध्यापक यांना कळविण्यात येते की, आपण राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीत गायनाची व्यवस्था करावी.
5. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, उपरोक्त बाब आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणुन द्यावी.
6. सुरक्षा अधिकारी यांना माहितीस्तव.
7. संस्थेतील सर्व सुचना फलक
8. आस्थापना विभाग.

D:\Ram Krushana\Suchana-2018.docx

Scanned by CamScanner